भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.८०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/१२/२०१७

**१) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून मारपीट केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक ०५/१२/२०१७ चे १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही घरी हजर असतांनी आरोपी हा फिर्यादीचे अंगनात अनाधीकृतपणे जावुन तिला तु माझ्या घरच्या गोष्टी बाहेर कशाला सांगतेस? असे म्हणुन भांडण शिवीगाळ करून थापडाने मारपीट करून धमकी दिल्याने, फिर्यादी सौ. वनिता ताराचंद शेंडे वय २९ वर्ष रा. पळसगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन साकोली कलम ४४८,३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विटाने डोक्यावर मारून जखमी केल्याने नोंद:—**

दिनांक ०५/१२/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा तुमसर येथुन बाजार करून त्याचे गावी टांगा येथे जात असता फिर्यादी हा विहीरगाव येथे पोहचला तेव्हा यातील आरोपीने फिर्यादी सोबत भांडण केला तेव्हा भांडण सोडविण्यासाठी वासुदेव सहसराम निंबार्ते वय ४० वर्ष रा. विहीरगाव हा गेला असता त्यास अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विटाने त्याचे डोक्यावर मारून जख्मी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी संजय भैयाजी गिन्हेपुंजे वय ४५ वर्ष रा. टांगा यांचे तोंडी रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन मोहाडी कलम २९४,३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत

**३) मोटार सायकलची चोरी:—**

दिनांक ०४/१२/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी यांनी त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६/एस ८१६७ स्प्लेंडर प्रो काळया रंगाची कि. २०,०००/रु. ची औषधोपचारा करीता गेला असता, कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी धनराज विठोबा वैद्य वय ४२ वर्ष रा. कोंढा यांचे तोंडी रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन भंडारा कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत

**४) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चलवीतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद:—**

**अ)** दिनांक ०५/१२/२०१७ चे ०९.४० ते १०.०५ वाजता दरम्यान यातील आरोपी हा मोटार सायकल क्र. एमएच ३६/टि ५५२५ पॅशन प्रो ही दारू पीवुन चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशीन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण पॉझीटीव्ह आल्याने व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरून सरतर्फे पोहवा. भुते वानीशा. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत

**ब)** दिनांक ०५/१२/२०१७ चे १९.२० ते १९.५५ वाजता दरम्यान यातील आरोपी त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही गांधी चौक भंडारा येथे दारू पीवुन चालवीतांना मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशीन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण पॉझीटीव्ह आल्याने व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरून सरतर्फे पोहवा. हाके वानीशा. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत

५) उपचारादरम्याण इसमाचा मृत्यु :—

दिनांक ०३/१२/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील मृतक बालचंद वामन गभणे वय ४६ रा. आकोट हा धाब्यावरून सामान काढीत असता जिन्यावरून उतरत असतांनी त्याचे पाय स्लिप होवुन खाली पडल्याने त्यास सा.रू.भंडारा येथे उपचाराकामी भरती केले असता, उपचारादरम्याण मरण पावल्याने पो.स्टे.भंडारा येथुन सदर मर्गचे कागदपत्रे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. नंदेश्वर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

६) अचानक प्रकृती खराब होऊन महिलेचा मृत्यु. :—

दिनांक ०४/१२/२०१७ चे १२.१५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ.मनिषा वामन बानणे वय ४० रा. चिचखेडा हिची अचानक प्रकृती खराब झाल्याने उपचारासाठी ग्रामिण रूग्णालय मोहाडी येथे नेत असतांना ती बाथरूम मध्ये चक्कर येवुन पडली असता, ती बेशुद्ध झाल्याने पुढील उपचारा कामी सा.रू. भंडारा येथे आकस्मिक विभागात दि. ४/१२/२०१७ चे १२:१५ वाजता मरण पावल्याने पो.स्टे.भंडारा येथे प्राप्त मर्ग क्र. ००/१७ क.१७४ जा.फौ.चे कागदपत्रावरून सरतर्फे फिर्यादी पोशि. हाके यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुळे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

७) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :—

दिनांक ०५/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी,तुमसर,पवनी,अडयाळ,लाखंदुर वरठी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २७ हातभट्टी दारू किंमती २,७००/—रु. व जुगारातुन किमती ८७३/रु असा एकुन ३,५७३/रु चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०५/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०९ तीन सिटर वाहनांवरती २१ केसेस व ईतर वाहनांवरती १०५ केसेस करण्यात आलेले आहे.

06.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.